नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :-१५/११/२०१७

-: परिपत्र :-

पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये, गुरूवार दि. ९ नोव्हेंबर २०१७ रोजी दुपारी ३-०० (तीन) भरलेल्या माहे नोव्हेंबर २०१७ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.

विषय क्र.१/६००

संदर्भ - १) मा.सौ.विजयालक्ष्मी हरिहर यांचे दि. २४/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११६२,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१८ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र.१०६,अ.क्र.७,भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे(यादी क्र. एसजे १०),		
१)पान क्र.२४०, अ.क्र.५८०, प्रभाग क्र.१८ अ मध्ये ३३१ मासेआळी समाजमंदिर बांधणे	१० लाख	---
२)पान क्र.२४०, अ.क्र.५८१, प्रभाग क्र.१८ अ ९०२ शुक्रवार पेठ पंचमुखी मारुती मंदिर येथे समाजमंदिर बांधणे.	१० लाख	---
नवीन सुचविलेली कामे-		
१)प्रभाग क्र.१८ अ मध्ये विविध ठिकाणी व्यायाम साहित्य पुरविणे	---	१० लाख
२)प्रभाग क्र.१८ अ मध्ये स्वारगेट पोलिस लाईन येथे खेळाचे मैदान दुरुस्ती करणे	---	५ लाख
३)प्रभाग क्र.१८ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन चेंबर दुरुस्ती करणे व समपातळीवर उचलणे	---	५ लाख

विषय क्र.२/६०१

संदर्भ - १) मा.सौ.विजयालक्ष्मी हरिहर यांचे दि. २४/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११६३,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१८ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०२, अ.क्र. १६, शहरातील रस्ते काँक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र.१८१, अ.क्र.२९३, प्रभाग क्र.१८ अ मध्ये सुभानशा दर्गा चौक ते जैन मंदिर चौक यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने काँक्रीटीकरण करणे.	३० लाख	---
नवीन सुचविलेली कामे-		
१)प्रभाग क्र.१८ अ मध्ये विविध ठिकाणी नळाकोंडाळे दुरुस्ती करणे	---	१० लाख
२)प्रभाग क्र.१८ अ मध्ये विविध ठिकाणी स्टेनलेस स्टील बोलार्ड बसविणे	---	५ लाख
३)प्रभाग क्र.१८ अ मध्ये विविध ठिकाणी बोअरवेल दुरुस्ती करणे	---	५ लाख
४) प्रभाग क्र.१८ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन साफसफाई करणे गाळ काढणे	---	५ लाख
५) प्रभाग क्र.१८ अ मध्ये विविध ठिकाणी काँक्रीट व फरशी बसविणे	---	५ लाख

<u>विषय क्र.३/६०२</u>

संदर्भ – १) मा.सौ.वृषाली चौधरी यांचे दि. २५/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११६४,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.३१ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०),		
१)पान क्र.२३७, अ.क्र.४२८, प्रभाग क्र.३१क, स.नं.१३० औदुंबर सोसायटी वारजे येथील ४.५ गुंठे ॲमिनिटीवर योगा सेंटर उभारणे.	२० लाख	–––
२) पान क्र.२३७, अ.क्र.४२९, प्रभाग क्र.३१क, पश्चिम रंग सोसायटी जवळील ॲमिनिटी स्पेसवर बहुउद्देशिय हॉल उभारणे, विरंगुळा केंद्र, जीम उभारणे.	१० लाख	–––
३) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरणाने विकसित करणे, (यादी क्र. एसए २), पान क्र.१६३, अ.क्र.३८२, प्रभाग क्र.३१क, स.नं.१२५ व १२६ राजहंस कॉलनी येथे रस्ते करणे.	१० लाख	–––
नविन सुचविलेली कामे –		
१) प्रभाग क्र.३१क, कॅनॉल रोडला विविध ठिकाणी ब्लॉक बसविणे.	–––	१० लाख
२) प्रभाग क्र.३१क, विविध ठिकाणी कॉक्रीटीकरण करणे.	–––	१० लाख
३) प्रभाग क्र.३१क, मध्ये विविध ठिकाणी राडारोडा उचलणे.	–––	१० लाख
४) प्रभाग क्र.३१क, वारजे हायवे ओढा साफ सफाई करणे.	–––	१० लाख

<u>विषय क्र.४/६०३</u>

संदर्भ – १) मा.सौ.राणी भोसले यांचे दि. २६/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७८,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३८ ब मधील स.नं. ६५९ बिबवेवाडी येथील आरक्षित जागेवर महिलांसाठी व आर्थिक दुर्बल घटकांतील युवक व युवतींसाठी प्रशिक्षण केंद्र व रोजगारभिमुख बहुउद्देशीय इमारत बांधणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०२, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५),		
१)पान क्र.२०७, अ.क्र.५३२, प्रभाग क्र. ३८ ब पुनम गार्डन ते पर्पल प्लाझा डिझायनर पोल बसविणे.	१० लाख	–––
२)पान क्र.२०७, अ.क्र.५३०, प्रभाग क्र. ३८ ब लेकटाऊन परिसरामध्ये हायमास दिवे बसविणे.	१० लाख	–––
नविन सुचविलेले काम– प्रभाग क्र. ३८ ब मधील स.नं. ६५९ बिबवेवाडी येथील आरक्षित जागेवर महिलांसाठी व आर्थिक दुर्बल घटकांतील युवक व युवतींसाठी प्रशिक्षण केंद्र व रोजगारभिमुख बहुउद्देशीय इमारत बांधणे.	–––	२० लाख

<u>विषय क्र.५/६०४</u>

संदर्भ – १) मा.बापुराव कर्णेगुरुजी व मा.राहुल भंडारे यांचे दि. २६/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११७९,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

लोहगाव वाघोली हा मोठ्या प्रमाणात रहदारीचा असलेला रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. संपूर्ण पावसाळ्यात ८ ते १० अपघात या रस्त्यावर झालेले आहेत. लोहगाव संतनगर येथील रस्त्याला तर ६.६ इंचाचे खड्डे तसेच १५ फुट लांबी रूंदीचे खड्डे पडलेले असल्यामुळे वाहतुकीस अत्यंत धोकादायक झाला आहे. याबाबतचे फोटो ही दैनंदिन वर्तमान पत्रात आलेले होते.

लोहगाव स्मशानभूमी ते संतनगर पर्यंतचा रस्ता हा प्रत्येक पावसाळ्यात उखडतो, म्हणून एवढयाच भागात १० मीटर रूंदीचा रस्ता सिमेंट कॉक्रीट करण्याची गरज आहे. यासाठी लोहगावमध्ये भाड्याच्या खोल्यात व मोडकळीस आलेल्या इमारतीत पुणे मनपाची शाळा क्र.१२६ मुलांची भरते. या शाळेसाठी जागा संपादन करणे व शाळेची इमारत बांधणे यासाठी र.रू.१ कोटीची तरतूद सन २०१७–२०१८ च्या अंदाजपत्रकात केलेली आहे. परंतु शाळेसाठी जागा संपादन करणे, टेंडर काढणे या प्रक्रियेला बराच कालावधी लागणार आहे.

तरी सदरची रक्कम ही लोहगांव वाघोली रोड स्मशानभूमी ते संतनगर पर्यंत रस्ता यु.टी.डब्ल्यू.टी.पध्दतीने सिमेंट कॉक्रीट करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

	अर्थशिर्षक	कमी	अधिक
	सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र. क्र.एसजे २), पान क्र.२२३, अ.क्र.१५७, लोहगाव येथील शाळेचे आरक्षण असलेली जागा संपादन करणे व नविन शाळा इमारत बांधणे.	१ कोटी	---
नविन सुचविलेले काम –			
	लोहगांव वाघोली रोड स्मशानभूमी ते संतनगर पर्यंत रस्ता यु.टी.डब्ल्यू.टी.पध्दतीने सिमेंट कॉक्रीट करणे.	---	१ कोटी

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा. आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

<u>विषय क्र.६/६०५</u>

संदर्भ – १) मा.सौ.श्वेता खोसे–गलांडे,मा.राहुल भंडारे व मा.बापुसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि.२६/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८१,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ.क्र.	अर्थशिर्षक	कमी	अधिक
	सन२०१७–१८ चे अंदाजपत्रक,१०.पथ,१०.क.पथ सुधारणा,पान क्र.१००, अ.क्र.१,शहरातील रस्ते डांबरीकरणाने विकसित करणे, (यादी क्र. एसए २)		
१	पान क्र.१५६, अ.क्र.२६, प्रभाग क्र. ३ ब पाचवा मैल परिसरामध्ये रस्ते विकसित करणे	१० लाख	---
२	पान क्र.१५६, अ.क्र.२८, प्रभाग क्र. ३ ब सी.सी.डी. चौक ते निको गार्डन रस्ते विकसित करणे.	१० लाख	---
नवीन सुचविलेली कामे–			
१	प्रभाग क्र. ३ ब (भाग–१) मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे.	---	१० लाख
२	प्रभाग क्र. ३ ब (भाग–२) मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे.	---	१० लाख

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

<u>विषय क्र.७/६०६</u>

संदर्भ – १) मा.हरिदास चरवड यांचे दि. २७/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८२,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३३ अ मधील सर्व्हे नं. ५६/५ आशीर्वाद हॉटेल मते यांच्या ॲमेनिटी स्पेसमध्ये ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र योगासन, ग्रंथालय हॉल विकसित करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र.२५६, अ.क्र. १५४, प्रभाग क्र. ३३ अ समोरील वसंत विहार सोसायटी ॲमेनीटी स्पेसमध्ये नव्याने गार्डन विकसित करणे.	१० लाख	–––
नविन सुचविलेले काम प्रभाग क्र. ३३ अ मधील सर्व्हे नं. ५६/५ आशीर्वाद हॉटेल मते यांच्या ॲमेनिटी स्पेसमध्ये ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र योगासन, ग्रंथालय हॉल विकसित करणे	–––	१० लाख

<u>विषय क्र.८/६०७</u>

संदर्भ – १) मा.हरिदास चरवड यांचे दि. २७/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८३,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३३ अ मधील सर्व्हे नं. ५५/९अ/२/१० हायवे परिसरात (व्यंकटेश ॲमेनिटी स्पेसमध्ये) सांस्कृतिक हॉल विकसित करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र.एसयु १), पान क्र.२५६, अ.क्र. १५४, प्रभाग क्र. ३३ अ सर्व्हे नं. २०/१+२/१ क्रिस्टल कॅसल सोसायटी समोर ॲमेनीटी स्पेसमध्ये गार्डन विकसित करणे.	१० लाख	–––
नविन सुचविलेले काम– प्रभाग क्र. ३३ अ मधील सर्व्हे नं. ५५/९अ/२/१० हायवे परिसरात (व्यंकटेश ॲमेनिटी स्पेसमध्ये) सांस्कृतिक हॉल विकसित करणे.	–––	१० लाख

<u>विषय क्र.९/६०८</u>

संदर्भ – १) मा.सौ.दिपाली धुमाळ यांचे दि. २७/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८४,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३२ क स्नेहा कॉम्पलेक्स, राजयोग सोसायटी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १०.च, स्ट्रॉम वॉटर ड्रेन प्रकल्प, पान क्र. १०६, अ.क्र. १, पुणे शहरातील पावसाळी पाण्याच्या व्यवस्थापनासाठी नाला सुधारणा कामे, कल्व्हर्टस व पावसाळी लाईन टाकणे, (यादी क्र.एसएफ १), पान क्र.२१७, अ.क्र.८९, प्रभाग क्र. ३२ क विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे	१० लाख	–––
नविन सुचविलेले काम– प्रभाग क्र. ३२ क स्नेहा कॉम्पलेक्स, राजयोग सोसायटी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे	–––	१० लाख

<u>विषय क्र.१०/६०९</u>

संदर्भ – १) मा.अजय खेडेकर यांचे दि. २७/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८५,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १८ क मधील पुणे मनपाच्या कॉलनी क्र. ८ व ९ मध्ये सिमाभिंत बांधणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३३, अ.क्र.२४०, प्रभाग क्र. १८ क मध्ये नागरिकांकरीता विविध ठिकाणी वाचनालये उभारणे.	१० लाख	–––
नविन सुचविलेले काम–		
प्रभाग क्र. १८ क मधील पुणे मनपाच्या कॉलनी क्र. ८ व ९ मध्ये सिमाभिंत बांधणे	–––	१० लाख

<u>विषय क्र.११/६१०</u>

संदर्भ – १) मा.कु.सायली वांजळे यांचे दि. २७/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११८६,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.३२ब मध्ये न्यू अहिरे गावातील विठ्ठल मंदिरा जवळील मोकळ्या जागेत उद्यान विकसित करणेसाठी र.रू. ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४)		
१) पान क्र.२४६, अ.क्र.१३१, प्रभाग क्र. ३२ ब मधील ॲमिनीटी स्पेस मध्ये क्रिडांगण विकसित करणे.	२० लाख	–––
२) पान क्र.२४६, अ.क्र.१३२, प्रभाग क्र. ३२ ब मधील न्यू अहिरे गावातील विठ्ठल मंदिराजवळ जॉगिंग ट्रॅक,गार्डन व क्रिडांगण विकसीत करणे.	२० लाख	–––
<u>नवीन सुचविलेले काम –</u>		
प्रभाग क्र.३२ ब मध्ये न्यू अहिरे गावातील विठ्ठल मंदिरा जवळील मोकळ्या जागेत उद्यान विकसित करणे.	–––	४० लाख

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

<u>विषय क्र.१२/६११</u>

संदर्भ – १) मा.सुशिल मेंगडे व मा.राजाभाऊ बराटे यांचे दि. २७/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११८७,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३१ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक,		
१)१०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०२, अ.क्र. १६, शहरातील रस्ते काँक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र. १८५, अ.क्र. ४९५, प्रभाग क्र. ३१ अ मधील स.नं.१५ श्रमसाफल्य कॉलनी येथील रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१० लाख	–––
२) १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र. २४६, अ.क्र. १२६, प्रभाग क्र. ३१ अ मधील स.नं. १८ तिरुपतीनगर, वारजे येथे ॲमेनिटी स्पेसमध्ये खेळाचे मैदान विकसित करणे	१० लाख	–––
नविन सुचविलेले काम–		

१)प्रभाग क्र. ३१ अ, वारजे–कर्वेनगर भागातील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन जेटींग मशिनने साफसफाई करणे	---	१० लाख
२)प्रभाग क्र. ३१ अ, वारजे–कर्वेनगर भागात नागरिकांसाठी पॅगोटा उभारणे	---	१० लाख

<u>विषय क्र.१३/६१२</u>

संदर्भ – १) मा.प्रकाश ढोरे यांचे दि. ३०/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११८९,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ८ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र. क्र.एसजे २),		
१) पान क्र.२२१, अ.क्र.३५, प्रभाग क्र. ८ ड मध्ये झाकीर हुसेन शाळा येथे विविध विकास कामे करणे	१० लाख	---
२) पान क्र.२२१, अ.क्र.३६, प्रभाग क्र. ८ ड मध्ये विविध शाळांमध्ये विविध विकास कामे करणे	१० लाख	---
३) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३१, अ.क्र.११६, प्रभाग क्र. ८ ड मध्ये सर्व विहारे विविध कामे करणे	१० लाख	---
४) क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे, (यादी क्र. एसडी २), पान क्र.५३, अ.क्र.१६५, प्रभाग क्र. ८ ड मध्ये स.नं. २४, २५, २६ येथील ड्रेनेज लाईन टाकणे	१० लाख	---
नविन सुचविलेली कामे–		
१)प्रभाग क्र. ८ ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे (भाग–१)	---	१० लाख
२)प्रभाग क्र. ८ ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे (भाग–२)	---	१० लाख
३) प्रभाग क्र. ८ ड मध्ये चॅम्पीयन मशीन व जेटींगच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन साफ करणे (भाग–१)	---	१० लाख
४) प्रभाग क्र. ८ ड मध्ये चॅम्पीयन मशीन व जेटींगच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन साफ करणे (भाग–२)	---	१० लाख

<u>विषय क्र.१४/६१३</u>

संदर्भ – १) मा.प्रिया गदादे व मा.श्रीमती अमृता बाबर यांचे दि. ३०/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९०,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ४० ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ९० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, (यादी क्र. एसपी २),		
१) पान क्र.४०, अ.क्र.४५८, प्रभाग क्र.३० ब पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे व जनता वसाहत चुनाभटटी परिसरात.	१० लाख	---
२) पान क्र.४०, अ.क्र.४५९, प्रभाग क्र.३० ब गल्ली नं.५१ ते ६० येथे जुने नळ कनेक्शन काढून नवीन १ इंची लाईन बदलणे	१० लाख	---
३) पान क्र.४०, अ.क्र.४६०, प्रभाग क्र.३० ब गल्ली नं.६१ ते ७० येथे जुने नळ		

कनेक्शन काढून नवीन २ इंची लाईन बदलणे	१० लाख	---
४) पान क्र.४०, अ.क्र.४६१, प्रभाग क्र.३० ब गल्ली नं.७१ ते ८० येथे जुने नळ कनेक्शन काढून नवीन दीड इंची लाईन बदलणे	१० लाख	---
५) पान क्र.४०, अ.क्र.४६२, प्रभाग क्र.३० ब गल्ली नं.८१ ते ९० येथे जुने नळ कनेक्शन काढून नवीन २ इंची लाईन बदलणे	१० लाख	---
६) पान क्र.४०, अ.क्र.४६३, प्रभाग क्र.३० ब गल्ली नं९१ ते १०० येथे जुने नळ कनेक्शन काढून नवीन १ इंची लाईन बदलणे	१० लाख	---
७) पान क्र.४०, अ.क्र.४६४, प्रभाग क्र.३० ब गल्ली नं.१०१ ते १०८ येथे जुने नळ कनेक्शन काढून नवीन १ इंची लाईन बदलणे	१० लाख	---
८) पान क्र.४०, अ.क्र.४६५, प्रभाग क्र.३० ब स.नं.१३२ येथे येथे जुने नळ कनेक्शन काढून नवीन २ व १२ इंची लाईन बदलणे	१० लाख	---
९) पान क्र.४०, अ.क्र.४६६, प्रभाग क्र.३० ब पानमळा येथे जुने नळ कनेक्शन काढून नवीन अर्धा व १ इंची लाईन बदलणे	१० लाख	---
नविन सुचविलेली कामे–		
१) प्रभाग क्र.४० ब मध्ये साईनगर परिसरात विविध ठिकाणी विविध व्यासाच्या पाण्याच्या लाईन टाकणे.	---	२० लाख
२) प्रभाग क्र.४० ब मध्ये आगम मंदिर परिसरात विविध ठिकाणी विविध व्यासाच्या पाण्याच्या लाईन टाकणे.	---	२० लाख
३) प्रभाग क्र.४० ब मध्ये बालाजी संकुल परिसरात विविध ठिकाणी विविध व्यासाच्या पाण्याच्या लाईन टाकणे.	---	१० लाख
४)प्रभाग क्र.४० ब मध्ये विविध ठिकाणी विविध व्यासाच्या पाण्याच्या लाईन टाकणे.	---	२० लाख
५)प्रभाग क्र.४० ब मध्ये सच्चाई माता मंदिर परिसरात विविध ठिकाणी विविध व्यासाच्या पाण्याच्या लाईन टाकणे.	---	२० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>विषय क्र.१५/६१४</u>

संदर्भ – १) मा.सौ.कविता वैरागे व मा.सौ.रंजना टिळेकर यांचे दि. ३०/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९१,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २८ अ मध्ये आनंद मिरा परिसरात फुटपाथ विकसित करणेसाठी र.रू. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, ७.आरोग्य विभाग, पान क्र. ९८, अ.क्र. १९, शहरामध्ये नव्याने प्रसुतिगृह/विविध सोयीसुविधा असलेले दवाखाने बांधणे. (यादी क्र. एसजे ६), पान क्र.२२५, अ.क्र.४५, प्रभाग क्र. २८ अ मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर दवाखान्यामध्ये अल्ट्रा साउंड सोनोग्राफी मशीन बसविणे व इतर शस्त्र खरेदी करणे	२५ लाख	---
नविन सुचविलेले काम–		
प्रभाग क्र. २८ अ मध्ये आनंद मिरा परिसरात फुटपाथ विकसित करणे	---	२५ लाख

<u>विषय क्र.१६/६१५</u>

संदर्भ – १) मा.श्रीमती स्मिता वस्ते यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९२,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २९ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक,		
१) १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४५, अ.क्र.११७, प्रभाग क्र. २९ क सह्याद्री ग्राऊंड येथे विविध विकास कामे करणे	१० लाख	–––
२) १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०६, अ.क्र.३, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी क्र. एसएल १), पान क्र.२१३, अ.क्र.१७, प्रभाग क्र. २९ क अंबिल ओढयावरील सर्व पुलाच्या कठडयावरुन पाण्यात कचरा टाकू नये म्हणून संरक्षक जाळी बसविणे	१० लाख	–––
नविन सुचविलेली कामे–		
१) प्रभाग क्र.२९ क मधील घनकचरा व्यवस्थापनाकरीता दोन स्कूप टाईट छोटा हत्ती (वाहन) खरेदी करणे	–––	७.५ लाख
२) प्रभाग क्र.२९ क मधील घनकचरा व्यवस्थापनाकरीता दोन स्कूप टाईट छोटा हत्ती (वाहन) खरेदी करणे	–––	७.५ लाख
३) प्रभाग क्र.२९ क मधील शौचालय व समाजमंदिर दुरुस्ती करणे	–––	२ लाख
४) प्रभाग क्र.२९ क मधील चेंबर दुरुस्ती व साफसफाई करणे	–––	२ लाख
५) प्रभाग क्र.२९ क मधील पाणी पुरवठा विषयक तदअनुषंगिक कामे करणे	–––	१ लाख

<u>विषय क्र.१७/६१६</u>

संदर्भ – १) मा.विशाल तांबे, मा.किशोर उर्फ बाळासाहेब धनकवडे व मा.सौ.अश्विनी भागवत यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९४,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३९ अ, ब, ड मधील प्रभागातील धनकवडी स्मशानभूमीमध्ये विविध विकास कामे करणे व तद्अनुषंगिक कामे करणेसाठी र.रू. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३९, अ.क्र.५३१, प्रभाग क्र. ३९ अ, ब, ड मधील प्रभागातील श्रेयश गार्डन परिसरातील बहुउद्देशीय हॉलचे अपूर्ण काम पूर्ण करणे व तद्अनुषंगिक कामे करणे.	२५ लाख	–––
नविन सुचविलेले काम–		
प्रभाग क्र. ३९ अ, ब, ड मधील प्रभागातील धनकवडी स्मशानभूमीमध्ये विविध विकास कामे करणे व तदअनुषंगिक कामे करणे	–––	२५ लाख

<u>विषय क्र.१८/६१७</u>

संदर्भ – १) मा.विशाल तांबे, मा.किशोर उर्फ बाळासाहेब धनकवडे व मा.सौ.अश्विनी भागवत यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९५,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३९ अ, ब, ड मधील आंबेगाव पठार व धनकवडी भागात विविध ठिकाणी डांबरीकरण करणेसाठी र.रू. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, ४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३६, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी		

क्र.एसजी २), पान क्र.२६४, अ.क्र.२१३, प्रभाग क्र. ३९ अ, ब, ड मधील आंबेगाव पठार व धनकवडी भागात विविध ठिकाणी स्वच्छतागृह उभारणे, स्वच्छतागृहामध्ये विविध विकासकामे करणे व तद्अनुषंगिक कामे करणे.	१५ लाख	---
नविन सुचविलेले काम–		
प्रभाग क्र. ३९ अ, ब, ड मधील आंबेगाव पठार व धनकवडी भागात विविध ठिकाणी डांबरीकरण करणे.	---	१५ लाख

<u>विषय क्र.१९/६१८</u>

संदर्भ – १) मा.सुनिल कांबळे व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९६,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २६ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०),		
१) पान क्र.२३९, अ.क्र.५०६, प्रभाग क्र. ३६ ड मध्ये प्रेमनगर वसाहतीतील विरंगुळा केंद्रात सभामंडप उभारणे	१५ लाख	---
२) पान क्र.२३९, अ.क्र.५०७, प्रभाग क्र. ३६ ड मध्ये प्रेमनगर वसाहतीतील विरंगुळा केंद्रात विविध विकास कामे करणे	२० लाख	---
नविन सुचविलेली कामे–		
१)प्रभाग क्र. २६ ब काळेपडळ येथे स्पायडर मशिनने नाल्याची साफसफाई करणे	---	१५ लाख
२)प्रभाग क्र. २६ ब मध्ये विविध ठिकाणी स्पायडर मशिनने नाल्याची साफसफाई करणे	---	२० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

<u>विषय क्र.२०/६१९</u>

संदर्भ – १) मा.बापूराव कर्णेगुरुजी,मा.सौ.मुक्ता जगताप व मा.सौ.श्वेता खोसे–गलांडे यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९७,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र.३ मध्ये लोहगाव परिसरात गरजेप्रमाणे अंतर्गत १२ इंची ,१८ इंची व २४ इंची ड्रेनेज लाईन टाकून ती लोहगाव ते नगररोडच्या दर्ग्यापर्यंतच्या ड्रेनेज लाईनला जोडणेसाठी र.रू.८० लाखाचे व प्रभाग क्र.३ मध्ये १२ इंची व १८ इंची ड्रेनेज लाईन आवश्यकतेनुसार टाकणेसाठी र.रू.२० लाख असे एकूण र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, (यादी क्र. एसपी २), पान क्र.४४, अ.क्र.६३८, लोहगाव येथे २५ लाख लिटरची पाण्याची टाकी भूसंपादन करून बांधणे.	१ कोटी	---
नविन सुचविलेली कामे –		
१)प्रभाग क्र.३ मध्ये लोहगाव परिसरात गरजेप्रमाणे अंतर्गत १२ इंची,१८ इंची व २४ इंची ड्रेनेज लाईन टाकून ती लोहगाव ते नगररोडच्या दर्ग्यापर्यंतच्या ड्रेनेज लाईनला जोडणे	---	८० लाख
२) प्रभाग क्र.३ मध्ये १२ इंची व १८ इंची ड्रेनेज लाईन आवश्यकतेनुसार टाकणे.	---	२० लाख

<u>विषय क्र.२१/६२०</u>

संदर्भ – १) मा.मारुती तुपे व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९८,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २३ ड (हडपसर–सातववाडी) मध्ये हडपसर गाव येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिराचे सिमाभिंत, सुशोभिकरण व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक		
१) १२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२३५, अ.क्र.३२८, प्रभाग क्र. २३ ड मध्ये स.नं.१३ सातववाडी बापुजी बुवा समाजमंदिर नविन बांधणे.	१५ लाख	–––
२) २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९६, अ.क्र. १४, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, (यादी क्र. क्र.एसजे २), पान क्र.२२२, अ.क्र.९७, प्रभाग क्र. २३ ड मध्ये महात्मा फुले माध्यमिक विद्यालयाजवळ सिमाभिंत उंची वाढवून करणे व दुरुस्ती करणे.	५ लाख	–––
नविन सुचविलेले काम–		
प्रभाग क्र. २३ ड (हडपसर–सातववाडी) मध्ये हडपसर गाव येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिराचे सिमाभिंत, सुशोभिकरण व तदनुषंगिक कामे करणे	–––	२० लाख

<u>विषय क्र.२२/६२१</u>

संदर्भ – १) मा.राजेश बराटे व मा.अनिल टिंगरे यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९९,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ९ क मधील रस्ते डांबरीकरण करणे व काँक्रीटीकरण करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक		
१०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०२, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५),		
१) पान क्र.२०६, अ.क्र.४३०, प्रभाग क्र. ३१ ड कर्वेनगर मधील कुलश्री, मनोदय लाईट पोल उभारणे	१० लाख	–––
२) पान क्र.२०६, अ.क्र.४३१, प्रभाग क्र. ३१ ड कर्वेनगर हिंगणे स्त्री शिक्षण संस्था ते विठ्ठल मंदिर पाणंद रस्त्यावर विद्युत विषयक कामे करणे	१० लाख	–––
३) १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०४, अ.क्र. ३५, शहरामध्ये भूमिगत केबल टाकणे, (यादी क्र. एसबी ७), पान क्र.२११, अ.क्र.९२, प्रभाग क्र. ३१ ड कर्वेनगर शाहु कॉलनी पाणंद रस्ता येथे भुमिगत केबल टाकणे	१० लाख	–––
नविन सुचविलेले काम–		
प्रभाग क्र. ९ क मधील रस्ते डांबरीकरण करणे व काँक्रीटीकरण करणे	–––	३० लाख

<u>विषय क्र.२३/६२२</u>

संदर्भ – १) मा.प्रिया गदादे यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२००,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ३० ब व प्रभाग क्र. ९ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ७० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक,		
१) १०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरातील वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. टी२), पान क्र.१९५, अ.क्र.७३ , प्रभाग क्र. ३०ब मधील विविध ठिकाणी नामदर्शक फलक लावणे.	१० लाख	–––
२) १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरणाने विकसित करणे, (यादी क्र. एसए २), पान क्र.१६३, अ.क्र.३७३, प्रभाग क्र. ३०ब, मधील जनता बाग ते आपला चौक (कॅनॉल बाजू) डांबरीकरण करणे.	१० लाख	–––
१२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०),		
३) पान क्र.२३७, अ.क्र.४०४, प्रभाग क्र. ३०ब, मधील श्रीकृष्ण मंडळ गल्ली नं.९६ मंडप करणे.	१० लाख	–––
४) पान क्र.२३७, अ.क्र.४०७, प्रभाग क्र. ३०ब, मधील वाघजाई मंडळ वारकरी विसावा करणे.	२० लाख	–––
क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र.२४, अ.क्र. २, शहरामध्ये नाला चॅनलायझेशन करणे/नाल्याला सिमाभिंत बांधणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र. एसडी ३),		
५) पान क्र.७१, अ.क्र.७६, प्रभाग क्र.३०ब मधील राममंदिर हाफ रिबेंड चॅनेलायझिंग जाळ्या बसविणे	१० लाख	–––
६) पान क्र.७१, अ.क्र.७७, प्रभाग क्र. ३०ब, मधील वरची वाघजाई मंदिर रस्ता ते वरचा टप्पा चॅनेलाइजिंग जाळ्या बसविणे.	१० लाख	–––
<u>नवीन सुचविलेली कामे–</u>		
१) प्रभाग क्र. ३०ब, मधील जनता वसाहत येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे	–––	२० लाख
२) प्रभाग क्र. ३०ब, मधील जनता वसाहत जनता बाग ते विठ्ठल मंदिर परिसरात रस्ते विषयक कामे करणे.	–––	१० लाख
३) प्रभाग क्र. ३०ब, मधील जनता वसाहत विकास मंडळ परिसरात रस्ते दुरूस्ती विषयक कामे करणे.	–––	१० लाख
४) प्रभाग क्र. ३०ब, मधील जनता वसाहत परिसरात रस्ते दुरूस्ती विषयक कामे करणे.	–––	०५ लाख
५) प्रभाग क्र. ९ ड, मधील रस्ते डांबरीकरण करणे व कॉंक्रिटकरण करणे.	–––	२५ लाख

<u>विषय क्र.२४/६२३</u>

संदर्भ – १) मा.चेतन तुपे, विरोधी पक्षनेता व मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२०२,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करण्यासाठी रक्कम रूपये ५० लाखांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०६, अ.क्र.३, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी क्र. एसएल १), पान क्र.२१३, अ.क्र.११, पुणे सोलापुर रोड वरील मांजरी फाटा येथे रस्ता अंडरपास करणे.	५० लाख	–––
नवीन सुचविलेली कामे–		
१. प्रभाग क्र. २२ अ मध्ये मगरपट्टा स.नं.१६९ नाल्यालगत सिमाभिंत बांधणे.	–––	२० लाख
२. प्रभाग क्र. २२ अ मध्ये मगरपट्टा स.नं.१४७ नाल्यालगत सिमाभिंत बांधणे	–––	२० लाख
३. प्रभाग क्र. २२ अ मध्ये मगरपट्टा स.नं.१६९ शौचालयाची देखभाल दुरूस्ती करणे	–––	१० लाख

(मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

<u>विषय क्र.२५/६२४</u>

संदर्भ – १) मा.चेतन तुपे, विरोधी पक्षनेता व मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२०३,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. २२ मध्ये खालील विविध विकास कामे करण्यासाठी रक्कम रूपये १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १०.घ.पूल व नदी सुधारणा (विकास योजना), पान क्र.१०६, अ.क्र.३, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी क्र. एसएल १),		
१) पान क्र.२१३, अ.क्र.१२, प्रभाग मुंढवा केशवनगर येथे रोड अंडरपास करणे.	५० लाख	–––––
२) पान क्र.२१३, अ.क्र.१३, मगरपट्टा सिटी येथील सिझन मॉल – ॲमेनोरा पार्क येथील रस्ता अंडरपास करणे.	५० लाख	–––––
नवीन सुचविलेली कामे–		
१. मगरपट्टा येथील रस्ता रूंदीकरण करणे	–––––	२५ लाख
२. मगरपट्टा येथील रस्ता डांबरीकरण करणे	–––––	२५ लाख
३. मगरपट्टा सिटी समोरील डी पी रस्ता रूंदीकरण करणे	–––––	२५ लाख
४. ॲमेनोरा मॉल समोरील रस्ता रूंदीकरण करणे	–––––	२५ लाख

(मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

<u>विषय क्र.२६/६२५</u>

संदर्भ – १) मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२०४,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १० ड मध्ये खालील विविध विकास कामे करण्यासाठी र. रू. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे, (यादी क्र. एसडी २), पान क्र.५३, अनु.क्र.१८१, प्र.क्र.१० ड मधील शिंदेनगर परिसरामध्ये नविन ड्रेनेज लाईन टाकणे.	१५ लाख	–––
<u>नवीन सुचविलेली कामे –</u>		
१) प्रभाग क्र. १० ड डि पॅलेस चौक ते बावधन गावठाण येथे ड्रेनेज लाईन टाकणे व कॉक्रीट करणे.	–––	१० लाख
२) प्रभाग क्र. १० ड मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉक्रीट करणे.	–––	५ लाख

(मा. मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा. महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

<u>विषय क्र.२७/६२६</u>

संदर्भ – १) मा.सौ.ज्योती कळमकर व मा.सौ.स्वप्नाली सायकर यांचे दि. १/११/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२०५,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ९ ब मध्ये खालील विविध विकास कामे करण्यासाठी रक्कम रूपये २५ लाखांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८,		

शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४४, अ.क्र.४५, प्रभाग क्र. ९ ब डी.एस.के. विद्यानगरी शेजारील ॲमेनिटी स्पेसमध्ये स्विमिंग पूल बांधणे २५ लाख ----

नवीन सुचविलेली कामे–

१)प्रभाग क्र. ९ ब बाणेर येथील आरोग्य केंद्राची उर्वरित कामे करणे ----- १५ लाख

२)प्रभाग क्र. ९ ब बाणेर येथील महिला बचतगट भवन येथील उर्वरित कामे करणे ----- ८ लाख

३) प्रभाग क्र. ९ ब बाणेर येथील महिला बचतगट भवन येथे विद्युतविषयक कामे करणे ----- २ लाख

<u>विषय क्र.२८/६२७</u>

संदर्भ – १) मा.सौ.किरण जठार यांचे दि. १/११/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२०६,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते काँक्रिटीकरण करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ.क्र.	अर्थशिर्षक	कमी	अधिक
	सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक,		
१	१६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र.२५३, अ.क्र.१, प्रभाग क्र. १ अ (कळस धानोरी) उद्यानांमध्ये ठिबक सिंचन व देखभाल दुरुस्ती इ. कामे करणे.	१० लाख	---
२	१२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ७, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२२८, अ.क्र.१, प्रभाग क्र. १ अ (कळस धानोरी) मधील समाज मंदिरे व बौध्दविहार यांची दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे.	१० लाख	---
	नवीन सुचविलेले काम–		
१	प्रभाग क्र. १ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते काँक्रिटीकरण करणे.	---	२० लाख

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

<u>विषय क्र.२९/६२८</u>

संदर्भ – १) मा.डॉ.सौ.श्रध्दा प्रभुणे यांचे दि. १/११/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२०७,दि.७/११/२०१७

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. १० ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ.क्र.	अर्थशिर्षक	कमी	अधिक
	सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक,		
१	१०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १०२, अ.क्र. १, शहरामधील चौकांची सुधारणा/विकासकामे करणे, (यादी क्र. एसटी१), पान क्र.१९२, अ.क्र.७, प्रभाग क्र. १० ब मधील विविध भागातील चौक सुशोभिकरण करणे.	१५ लाख	---
२	१०.ख.वाहतूक नियंत्रण, पान क्र. १०२, अ.क्र. २, शहरातील वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. एसटी २), पान क्र.१९४, अ.क्र.१८, प्रभाग क्र. १० ब मध्ये विविध भागात वाहतुक विषयक कामे करणे.	०५ लाख	---
३	१७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र. २४४, अ.क्र.५०, प्रभाग क्र. १० ब मधील जीत ग्राऊंड फेन्सिंग करुन सुरक्षित करणे.	१० लाख	---

नवीन सुचविलेली कामे–

१	प्रभाग क्र. १० ब मध्ये बावधन, भुसारी कॉलनी, परम्हंस नगर व प्रभागामध्ये इतरत्र नागरिकांना बसण्याकरिता बेंचेस बसविणे.	–––	१० लाख
२	प्रभाग क्र. १० ब मध्ये कचरा वाहतूकीकरिता छोटाहत्ती खरेदी करणे.	–––	०६ लाख
३	प्रभाग क्र. १० ब मध्ये विविध ठिकाणी झाडे–झुडपे लावून सुशोभिकरण करणे.	–––	०४ लाख
४	प्रभाग क्र. १० ब मध्ये नवीन विद्युत पोल विषयक कामे करणे.	–––	१० लाख

<u>विषय क्र.३०/६२९</u>

संदर्भ – १) मा.सौ.सुनिता वाडेकर यांचे दि. १/११/२०१७ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२०८,दि.७/११/२०१७

–––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

प्रभाग क्र. ८ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, ४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३६, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र.एसजी २),		
१) पान क्र.२६०, अ.क्र.३६, प्रभाग क्र. ८ अ इंदिरानगर भोईटे चाळ येथे शौचालय बांधणे.	१० लाख	–––
२) पान क्र.२६०, अ.क्र.३७, प्रभाग क्र. ८ अ डॉ.आंबेडकर चौक, औंध रोड येथे शौचालय बांधणे.	१० लाख	–––

नविन सुचविलेली कामे–

१)प्रभाग क्र. ८ अ मधील भोईटे वस्ती स.नं. ५३/५४ गांधीनगर व स.नं.२४, २५, २६ बोपोडी येथील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे	–––	१० लाख
२) प्रभाग क्र. ८ अ मधील स.नं. ३९ औंध रोड, पाटील पडळ, संजयनगर व औंधगाव येथील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे	–––	१० लाख

<u>विषय क्र.३१/६३०</u>

संदर्भ – १) मे.नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांची दि.०४/१०/२०१७ ची अधिसूचना व शासन निर्णय क्रमांक पीएमसी–३०१४/प्र.क्र.६४/नवि–२२, दि.०४/१०/२०१७.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/४९१ दि.३१/१०/२०१७ चे पत्र.
३) मा.अविनाश बागवे, मा.सुनिल कांबळे यांची दि. ७/११/२०१७ ची उपसूचना.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२२३,दि.७/११/२०१७

–––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ठ होणाऱ्या ११ गावांमध्ये करावयाच्या विकसनासाठी जमेचे व खर्चाचे कोड तयार करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या क्षेत्रामधून/ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या व सदर क्षेत्राशी संबंधित जमेकरिता अंदाजपत्रकीय अर्थशिर्षके तयार करणे.
२) सन २०१७–१८ चे अंदाजपत्रकातील 'स' यादीमधून रक्कम कपात न करण्यास तसेच याबाबत कोणत्या अर्थशिर्षकामधून कपात करण्यात येईल याबाबत मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यास
३) सदर ११ गावांमधील क्षेत्रांच्या विकासासाठी खालीलप्रमाणे खर्चाची अर्थशिर्षके तयार करणे.

अ.क्र.	महसुली गावाचे नाव	खर्चाचे अर्थशिर्षक
१	लोहगाव (उर्वरित)	लोहगाव (उर्वरित) येथे विविध विकासाची कामे करणे
२	मुंढवा (उर्वरित केशवनगर)	मुंढवा (उर्वरित केशवनगर) येथे विविध विकासाची कामे करणे

३	हडपसर (संपूर्ण साडेसतरा नळी)	हडपसर (संपूर्ण साडेसतरा नळी) येथे विविध विकासाची कामे करणे
४	शिवणे (संपूर्ण उत्तमनगर)	शिवणे (संपूर्ण उत्तमनगर) येथे विविध विकासाची कामे करणे
५	शिवणे	शिवणे येथे विविध विकासाची कामे करणे
६	आंबेगाव खुर्द	आंबेगाव खुर्द येथे विविध विकासाची कामे करणे
७	उंड्री	उंड्री येथे विविध विकासाची कामे करणे
८	धायरी	धायरी येथे विविध विकासाची कामे करणे
९	आंबेगाव बुद्रुक	आंबेगाव बुद्रुक येथे विविध विकासाची कामे करणे
१०	फुरसुंगी	फुरसुंगी येथे विविध विकासाची कामे करणे
११	उरूळी देवाची	उरूळी देवाची येथे विविध विकासाची कामे करणे

<u>विषय क्र.३२/६३१</u>

संदर्भ – १) माहिती व तंत्रज्ञान कार्यालय जा.क्र मातं/दूरध्वनी/४६५ दिनांक ०७ / १०/२०१६

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मावतं(दूरध्वनी)/४९२ दि.१/११/२०१७ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२२४,दि.७/११/२०१७

–––––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

माहिती व तंत्रज्ञान कार्यालय, दूरध्वनी विभागाकडील विविध कंपनीचे मोबाईल व दूरध्वनी बिले आदा करणेसाठी र.रुपये ४२ लाख खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक, माहिती व तंत्रज्ञान कार्यालय, RE 11 N -103, १.मुख्य देखरेख वसुली वगैरे ड . सांख्यिकी व संगणक कार्यालय, ३. विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकामार्फत करून घेणे व तद्अनुषंगीक कामे करणे नविन सुचविलेले काम	४२ लाख	----
दूरध्वनी विभाग, RE11C-118, ड २ दूरध्वनी विभाग, ३.दूरध्वनी व्यवस्थेत सुधारणा करणे व मोबाईल फोनचे बिले देणेसाठी	----	४२ लाख

<u>विषय क्र.३३/६३२</u>

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/सा.प्र./४४१, दि.१३/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.सौ. दिशा माने व मा.जयंत भावे यांची दि.३०/१०/२०१७ ची उपसूचना.

३) मा.सौ. मनिषा लडकत ,मा.सौ.मनिषा कदम ,मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव,मा.सौ.सुनिता गलांडे (पाटील)व मा.राजेंद्र शिळीमकर यांची दि.३०/१०/२०१७ ची उपसूचना

४) मा. विधी समिती ठराव क्र.३०,दि.३०/१०/२०१७

––––

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून–

पुणे महानगरपालिकेच्या उप आयुक्त वर्ग –१ (पे.बॅन्ड १५,६००–३९,१०० + ग्रेड पे रू.६,६००+मान्य भत्ते) या हुद्याच्या ४ रिक्त पदे व १ पद तदर्थ पदोन्नतीने भरणेसाठी शासनाकडील वेळोवेळीचे प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून वरील प्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीवरील अधिकाऱ्यांची बढतीने नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५३ (१) नुसार मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अक्र	**सेवकांचे नाव**	**सध्याचा हुद्दा**	**शैक्षणिक पात्रता**	**बढतीचा हुद्दा**	**गट**	**बढतीसाठी जातीचा गट**
१	श्री. देशपांडे माधव नारायण	महापालिका सहायक आयुक्त	डी. सी. ई.	उप आयुक्त	खुला	खुला
२	श्री. माळी उमेश रामचंद्र	महापालिका सहायक आयुक्त	बी.कॉम, एल.एल.बी., डी.एल.एल. ॲण्ड एल. डब्ल्यू., डिप्लोमा इन	उप आयुक्त	खुला	खुला

अक्र	सेवकांचे नाव	सध्याचा हुद्दा	शैक्षणिक पात्रता	बढतीचा हुद्दा	गट	बढतीसाठी जातीचा गट
			जर्नालिझम, एल.जी.एफ.एम., एल.एस.जी.डी.			
३	श्रीमती गागरे संध्या दुला	महापालिका सहायक आयुक्त	बी.ए.	उप आयुक्त	अज	अज
४	श्री. गावडे संजय आत्माराम	महापालिका सहायक आयुक्त	डी.एम.ई, ए.एम.आय.ई.	उप आयुक्त	भजक	भजक

तसेच, मा. खातेनिहाय बढती समिती सदस्यांनी खालीलप्रमाणे तदर्थ पदोन्नती देणेबाबत शिफारस केली आहे.

अक्र	सेवकांचे नांव	सध्याचा हुद्दा	शैक्षणिक पात्रता	बढतीचा हुद्दा	गट
१	श्री. पाटील वसंत विठ्ठल	महापालिका सहायक आयुक्त	डी. सी. ई.	उप आयुक्त	खुला

संदर्भ क्र.२ च्या उपसूचेनुसार–

मा. महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात महापालिका सहाय्यक आयुक्त (वर्ग–१) या पदावरील कार्यरत अधिकारी यांना उपआयुक्त (वर्ग–१) या पदावर बढतीने नेमणूक करणेसाठी मा. खाते निहाय बढती समिती सदस्यांनी एकमताने निवडयादीसाठी ४ व तदर्थ पदोन्नती–१ देणेबाबत एकमताने शिफारस केली आहे.

सदरचे निवडयादीसाठी शिफारस केलेले ४ व तदर्थ –१ पदोन्नती देणेबाबत महापालिका सहाय्यक आयुक्त (वर्ग–१) यांना सद्यस्थितीत १५६००–३९१०० + ग्रेड पे रू.८१०० अशी वेतनश्रेणी आहे.

तथापी सदरच्या महापालिका सहाय्यक आयुक्त यांना उपआयुक्त वर्ग १ (पे बँड रू.१५६००–३९१०० + ग्रेड पे रू. ६६०० + मान्य भत्ते) या वेतनश्रेणीत शिफारस केलेली अव्यवहार्य, चुकीची आहे. सदरच्या बढती शिफारस केलेल्या महापालिका सहाय्यक आयुक्त वर्ग १ या पदावरील अधिकाऱ्यांनी या पदावर १७ वर्षे काम केलेले असून त्यांना बढतीसाठी आश्वासित प्रगती योजना, वरीष्ठश्रेणी पध्दतीने कोणताही फायदा देण्यात आलेला नाही.

सदरचे महापालिका सहाय्यक आयुक्त यांना पदोन्नती देताना पे बँड रू.८१००/– ऐवजी रू.६६००/– शिफारस केल्याने त्यांचे पदोन्नती मिळूनही नुकसान होणार आहे.

याबाबत मे. मुंबई हायकोर्ट रिट पिटीशन नं.२१७२/२०१५ मध्ये पुणे महानगरपालिकेने लेखी स्टेटमेंट देऊन वेतनातील कोणत्याही कपात करणेबाबत योग्य ती कार्यपध्दती अवलोकन केली जाईल. त्यामुळे वेतनातील कपात केली जाणार नाही असे आकृतीबंधातील ग्रेड पे बाबत नमुद केलेले आहे. त्यानुसार दि. ३१/१२/२०१५ रोजी मे. मुंबई हायकोर्टच्या ऑर्डर मध्ये सदर बाब नमुद केली आहे. त्यास अनुसरून विषयपत्रातील महापालिका सहाय्यक आयुक्त त्यांचा ग्रेड पे रू.८१००/– नंतर उपआयुक्त पदासाठी असलेला ग्रेड पे रू.८९००/– मे. मुंबई हायकोर्ट रिट पिटीशन नं. ३९९६/२०१५ अन्वये दि.१–३–२०१६ पासुन देण्यात यावा. अशाप्रकारे सुधारित आकृतीबंधास मान्यता मिळाल्यानंतर र.रू.८९००/– ग्रेड पे देऊन समाज विकास अधिकारी, अधिक्षक अभियंता या पदावर अधिकाऱ्यांना बढती देण्यात आलेली आहे.

सदरचे बढतीबाबत महापालिका सहाय्यक आयुक्त वर्ग १ यांना ग्रेड पे ८१००/– असताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर बढती मिळूनही उपआयुक्त पदाचा ग्रेड पे रू. ६६००/– न देता त्यांचा ग्रेड पे रू.८१००/– प्रोटेक्ट करण्यात यावा.

संदर्भ क्र.३ ची उपसूचेनुसार–

म.न.पा.कडील उप आयुक्त पदे बढतीने भरतेवेळी सद्यस्थितीतील सरळ सेवेची पदे ही महाराष्ट्रशासन,नगरविकास पत्र क्र.पी.एम.सी/प्र.क्र.७५८/नवि–२२,दि.२५/११/२०१६ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केले प्रमाणे प्रतिनियुक्तीच्या कोट्यात दर्शविण्याचे आदेश असताना जा.क्र .म.आ./सा. प्र.वि/ आस्था /५४२४ ,दि.३१/१२/२०१६ रोजीच्या पत्राने मा.प्रधानसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग–न.वि.–२२ यांना निवेदनाव्दारे मार्गदर्शन मागविण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे पी.एम.सी./प्र.क्र./७५८/ नवि–२२,दि.२५/११/२०१६ रोजीच्या महाराष्ट्र शासन नगरविकास मंत्रालयाच्या पत्रानुसार उपायुक्त पदांची नियुक्ती करण्यात यावी.तद्र्थ न करता २५/११/२०१६ रोजीचे पत्राप्रमाणे आरक्षणानुसार रितसर रिक्त जागेवर भरती बढतीने नेमणूक करावी.भरती प्रक्रियेनंतर तसे महाराष्ट्र शासन नगर विकास मंत्रालय यांना बाब माहितीसाठी क़ळवावी.

विषय क्र.३४/६३३

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ/सा.प्र./४४२, दि.१३/१०/२०१७ चे पत्र.
२) मा.राजेंद्र शिळीमकर मा.सौ.सुनिता गलांडे(पाटील) यांची दि.३०/१०/२०१७ ची उपसूचना
३) मा.सौ.मनिषा कदम ,मा.सौ.दिशा माने यांची दि.३०/१०/२०१७ ची उपसूचना
४) मा.जयंत भावे,मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव, मा.ॲड्.अब्दुल गफुर अहंमद पठाण,मा.सौ.दिपाली धुमाळ यांची दि.३०/१०/२०१७ ची उपसूचना
५) मा. विधी समिती ठराव क्र.३१,दि.३०/१०/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून–

पुणे महानगरपालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त वर्ग –१ (पे.बॅन्ड १५,६००–३९,१०० + ग्रेड पे रू.५,४०० + मान्य भत्ते) या हुद्याच्या ६ रिक्त पद भरणेसाठी शासनाकडील वेळोवेळीचे प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून खालील प्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीवरील अधिकाऱ्यांची बढतीने नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ५३ (१) नुसार मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अक्र	सेवकांचे नांव	सध्याचा हुद्दा	शैक्षणिक पात्रता	बढतीचा हुद्दा	गट	बढतीसाठी जातीचा गट
१	श्री. महाडदळकर आशिष सुरेश	प्रशासन अधिकारी	बी.कॉम., एल.एस.जी.डी.	महापालिका सहाय्यक आयुक्त	खुला	खुला
२	श्री. जंगले प्रकाश नारायण	प्रशासन अधिकारी	बी.कॉम.	महापालिका सहाय्यक आयुक्त	अज	अज
३	श्री. सुपे ज्ञानदेव कोंडीबा	प्रशासन अधिकारी	बी.कॉम., एल.एस.जी.डी.	महापालिका सहाय्यक आयुक्त	अज	खुला
४	श्री. रेंगडे राजेंद्र नामदेव	प्रशासन अधिकारी	बी.ए., एल.एस.जी.डी.	महापालिका सहाय्यक आयुक्त	अज	खुला
५	श्री. तारू शाम काशिनाथ	प्रशासन अधिकारी	बी.कॉम.	महापालिका सहाय्यक आयुक्त	भज–ब	भज–ब
६	श्री. कडलख वैभव भानुदास	प्रशासन अधिकारी	एम.पी.एम., एम.ए., डी.एल.एल.ॲण्ड एल डब्ल्यू. डी. फार्म.,डी.एन.टी.वाय.एम. एल.जी.एस.	महापालिका सहाय्यक आयुक्त	अजा	अजा

संदर्भ क्र.२ च्या उपसूचनेनुसार

मा. महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रात महापालिका प्रशासन अधिकारी (वर्ग–२) या पदावरील कार्यरत अधिकारी यांना महापालिका सहाय्यक आयुक्त (वर्ग–१) या पदावर बढतीने नेमणूक करणेसाठी मा. खाते निहाय बढती समिती सदस्यांनी एकमताने निवडयादीसाठी ६ सेवकांची एकमताने शिफारस केली आहे.

सदरचे निवडयादीसाठी शिफारस केलेले ६ पदोन्नती देणेबाबत प्रशासन अधिकारी (वर्ग–२) यांना सद्यस्थितीत ९३००–३३८०० + ग्रेड पे रू.५९०० अशी वेतनश्रेणी आहे.

तथापी सदरच्या महापालिका प्रशासन अधिकारी (वर्ग–२) यांना महापालिका सहाय्यक आयुक्त वर्ग १ (पे बँड रू.१५६००–३९१०० + ग्रेड पे रू. ५४०० + मान्य भत्ते) या वेतनश्रेणीत शिफारस केलेली अव्यवहार्य, चुकीची आहे. सदरच्या बढती शिफारस केलेल्या प्रशासन अधिकारी (वर्ग–२) या पदावरील अधिकाऱ्यांनी या पदावर सुमारे ४ ते १२ वर्षे काम केलेले असून त्यांना बढतीसाठी आश्वासित प्रगती योजना, वरीष्ठश्रेणी पध्दतीने कोणताही फायदा देण्यात आलेला नाही.

सदरचे महापालिका प्रशासन अधिकारी (वर्ग–२) यांना पदोन्नती देताना पे बँड रू.५९००/– ऐवजी रू.५४००/– शिफारस केल्याने त्यांचे पदोन्नती मिळूनही नुकसान होणार आहे.

सदरचे बढतीबाबत प्रशासन अधिकारी (वर्ग–२) यांना ग्रेड पे ५९००/– असताना नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर बढती मिळूनही महापालिका सहाय्यक आयुक्त पदाचा ग्रेड पे रू. ५४००/– न देता त्यांचा ग्रेड पे रू.८१००/– प्रोटेक्ट करण्यात यावा.

संदर्भ क्र.३ च्या उपसूचनेनुसार

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचा शासन आदेश क्र. पी.एम.सी./३०१४/प्र.क्र.०२/नवि–२२ मंत्रालय मुंबई–३२ दि.२६ ऑगस्ट २०१४ चे शासन निर्णयान्वये पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मध्ये परिशिष्ट २ मधील पान क्र. ८ वर सहाय्यक आयुक्त हे पद भरणेबाबतची तरतूद

विहित करण्यात आलेली असून नेमणूकीची पद्धत, अर्हता व टक्केवारी खालीलप्रमाणे. या उपरोक्त दोन बाबीत तफावत दिसून येत आहे.

